मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

प्रत्र क.रासेयो/ ६८४ /२०१५—१६
दिनांक : २८/ १० /२०१५

प्रति,

मा. प्राचार्य राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत
मुंबई विद्यापीठाशी अधिनस्त सर्व महाविद्यालये.

संदर्भः शासन परिपत्रक क्रमांक:संकीर्ण—११/(प्र.क्र.१४६/१५)समन्वय, दिनांक १५.१०.२०१५.

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भ पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाअंतर्गत विविध मान्यवर व्यक्ती/अधिकारी व इतर संबधीत व्यक्ती विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने भेटी देत असतात. सर्वसाधारणपणे संबधीत पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले जाते. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा जन्मदिन '१५ ऑक्टोबर' हा दिवस ''वाचक प्रेरणा दिवस'' म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनातर्फे घेण्यात आला आहे. हया पार्श्वभुमीवर वाचन संस्कृती जपण्यासाठी वाचनास प्रेरणा मिळणेसाठी आपण राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत आयोजित विविध उपक्रमांमध्ये मान्यवर व्यक्ती/अधिकारी यांचे भेटी दरम्यान किंवा समारंभाच्या वेळी त्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्या ऐवजी विविध विषयांवरील पुस्तके देऊन करण्यात यावे.

वाचनसंस्कृती जतन करण्यासाठी आपला हातभार अपेक्षीत आहे.

आपला विश्वासू

(बिडवे)

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग